दैनिक
# महावृत्त
E-Mail:dainikmhavratt@gmail.com
संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ४ थे अंक २२ वा गुरूवार दि.२० जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## महायुती सरकारविरोधात शुक्रवारी काँग्रेसचे 'चिखल फेको' आंदोलन

मुंबई, : राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत असताना महायुतीचे सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या सरकारने जनतेला वाऱ्यावर सोडून दिले आहे, असा आरोप काँग्रेसने महायुतीवर केला आहे. महायुती सरकारविरोधात काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी (दि.२१) राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयी सकाळी ११.०० वाजता सरकारच्या प्रतिमेस चिखल लावून 'चिखल फेको' आंदोलन करण्यात येणार आहे.राज्यातील व केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे सरकार हे शेतकरी, कष्टकरी, दलित, अल्पसंख्याक, महिला, तरूण, गरीब व सामान्य जनतेच्या विरोधातील आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने चालणाऱ्या महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळिमा फासण्याचे काम या सरकारने केले आहे. मागील १० वर्षापासून भाजपा सरकारने राज्यातील औद्योगिक विकासाला खीळ घातली आहे. सरकारी नोकर भरती केली जात नाही. स्पर्धा परीक्षा वेळेवर घेतल्या जात नाहीत, ह्या परीक्षा घेतल्या तर पेपरफुटीचे ग्रहण लागते, शेतकरी संकटात आहे पण त्यांना मदत दिली जात नाही. कांदा, कापूस, सोयाबीन यासह कोणत्याही शेतमालाला भाव नाही, सरकार एमएसपी देत नाही. कठीण काळात जनतेला मदत करण्याऐवजी सरकार जनतेचे शोषण आणि आर्थिक पिळवणूक करत आहे, असा आरोप काँग्रेसने महायुतीवर केला आहे. तसेच नीट परिक्षेच्या पेपरफुटी व निकालातील गैरव्यवहारामुळे देशभरातील लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य सरकारने धोक्यात आणले आहे. महागाई, बेरोजगारी, पेपरफुटी, महिला सुरक्षा, खते, बि-बियाणांचा काळाबाजार, कर्जासाठी शेतकऱ्यांची होत असलेली अडवणूक, चिखलात सुरु असलेली पोलीस भरती, राज्यातील सरकारी रिक्त पदे भरण्याबाबत चालवलेली चालढकल, राज्यातील बिघडलेली कायदा व सुव्यवस्था बिघडलेली आहे. श्रीमंतांची पोर गोरगरिबांना गाड्याखाली चिरडून मारत आहेत. मुलींचे दिवसाढवळ्या रस्त्यावर खून पाडले जात आहेत. सत्ताधारी पक्षाकडून जाती-धर्माच्या नावाखाली सामाजिक शांतता भंग करण्याचे प्रयत्न सुरु आहेत, असाही गंभीर आरोप काँग्रेस पक्षाने महायुतीच्या सरकारवर केला आहे. त्यामुळे महायुतीच्या सरकारविरोधात जनतेत तीव्र संताप असून सरकारला जाब विचारण्यासाठी आंदोलन केले जाणार असल्याचे काँग्रेसने स्पष्ट केले आहे.

# नारायण राणे यांची खासदारकी रद्द करा: विनायक राऊत

मुंबई, : रत्नागिरी-सिंधुदुर्ग लोकसभा मतदारसंघातून नारायण राणे यांनी भ्रष्ट मार्गांचा वापर करत लोकसभा निवडणुकीत विजय मिळवलेला आहे. त्यामुळे नारायण राणे यांची निवड रद्द करावी तसेच त्यांच्यावर ५ वर्ष निवडणूक लढविण्यापासून आणि मतदान करण्यापासून बंदी घालण्यात यावी. याबाबत ठाकरे शिवसेनेचे उमेदवार विनायक राऊत यांनी ॲड. असीम सरोदे, ॲड. किशोर वरक, ॲड. श्रीया आवले यांच्या मार्फत निवडणूक आयोगाला कायदेशीर नोटीस पाठवलेली आहे.

निवडणूक प्रचार कालावधी दि.५ मे रोजी संपुष्टात आला. त्यानंतरही भाजप कार्यकर्त्यांनी दि.६ मे रोजीसुद्धा नारायण राणे यांचा प्रचार करीत होते. राणेच्या समर्थकांनी प्रचार संपलेला असताना ईव्हीएम मशीन दाखवून राणे साहेबांनाच मत द्या, असे सांगून मतदारांना पैसे देत असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या सर्व गोष्टीची माहिती नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेले आहे.



### नितेश राणेंकडून मतदारांना इशारा

नारायण राणे यांचे पुत्र आमदार नितेश राणे यांनी जाहीर सभा घेऊन मतदारांना इशारा दिला की, जर राणे साहेबांना मतदान केले नाही, त्यांना लीड मिळाली नाही तर आमच्याकडे निधी मागायला यायचे नाही, असा इशारा १३ एप्रिल रोजी झालेल्या सभेत नितीश राणे यांनी दिली. याचाही उल्लेख या नोटीसमध्ये करण्यात आलेला आहे.

निवडणूक आचारसंहितेचा नारायण राणे, नितेश राणे आणि भाजप कार्यकर्त्यांनी भंग केलेला आहे. त्यामुळे ही लोकशाहीची फसवणूक आहे. या निवडणुकीची चौकशी करून सात दिवसांमध्ये उत्तर द्यावे, अशी मागणी राऊत यांनी नोटिसीमध्ये केलेली आहे. तसेच राणे यांच्या निवडीला उच्च न्यायालयात याचिका दाखल करून आव्हान करण्यात येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

### पारदर्शक वातावरणात मतदान, मतमोजणी झाली नाही : ॲड. असीम सरोदे

अनेक ठिकाणी सुरक्षित आणि पारदर्शक वातावरणात मतदान तसेच मतमोजणी झाली नाही. निवडक पद्धतीने भ्रष्टाचार करू देणे, भाजपच्या लोकांनी केलेला भ्रष्टाचार आणि बेकायदेशीरतेकडे दुर्लक्ष करणे असे प्रकार काही निवडणुक निर्णय अधिकार्यांच्या मदतीने करण्यात आले आहेत. हे वास्तव लोकशाही यंत्रणेचा गैरवापर दाखविणारे आहेत. त्याबाबत नागरिक म्हणून भारतावर प्रेम करणार्या प्रत्येकाने चिंता व्यक्त करावी, अशी परिस्थिती असल्याचे ॲड. असीम सरोदे म्हणाले.

## कृषी महाविद्यालयाच्या जागेची किंमत देण्यास सार्वजनिक आरोग्य विभागाची मंजुरी, लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा

लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जागेची किंमत म्हणून लातूर कृषी महाविद्यालयास ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये वर्ग करण्यास मंजुरी दिली असल्यामुळे लातूर येथील जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या संदर्भातील अधिक माहिती अशी, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी लातूर व परिसरातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सोयी सुविधा मिळाव्यात, वैद्यकीय क्षेत्रात जाणाऱ्या लातूरच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून लातूर येथे जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले होते. त्यानंतर त्यांच्याच कार्यकाळात लातूर साठी स्वतंत्र जिल्हा रुग्णालयही मंजूर झाले, मात्र या रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने, या रुग्णालयाची उभारणी करण्यात अडचण निर्माण झाली होती. माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी यासंदर्भात पाठपुरावा करून लातूर मधील कृषी महाविद्यालयाची



१० एकर जागा रुग्णालय उभारणीसाठी मंजूर करून घेतली होती, कृषी महाविद्यालयाची जागा रुग्णालय उभारणीसाठी उपलब्ध झाली मात्र त्या जागेची किंमत शासकीय स्तरावरून कृषी महाविद्यालयाकडे पर्यायाने वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या, सदरील अडचण दूर करण्यासाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काही दिवसापूर्वी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री, प्रा तानाजी सावंत यांची भेट घेऊन कृषी महाविद्यालयाच्या जागेचे बाजार मूल्य म्हणून ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठात वर्ग करण्याची विनंती केली होती, या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, त्यांनी सदरील निधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडे वर्ग करण्यास मंजुरी दिली आहे,

लातूर जिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होण्याचा प्रश्न आता मार्गी लागला असल्यामुळे लवकरात लवकर हे रुग्णालय उभारले जाईल या ठिकाणी, सर्वसामान्य रुग्णांना उच्च दर्जाच्या अद्यावत आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. सदरील जागा उपलब्ध होण्यासाठी माझं लातूर परिवारासह विविध संस्था संघटना यांनीही प्रयत्न केले असून त्या सर्वांच्या प्रयत्नाला यश आले असल्याचे सांगून त्यांचेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आभार मानले आहेत.

## फुकट्या प्रवाशांनो सावधान; मध्य रेल्वे करणार कडक कारवाई

मुंबई; : विना तिकिट प्रवाशांची वाढती संख्या कमी करण्यासाठी बुधवारी (दि.१९) मध्य रेल्वेने विनातिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या प्रवाशांकडे मेल-एक्सप्रेसचे तिकिट नसेल, त्या प्रवाशांकडून प्रवास केलेल्या स्थानकापर्यत दंड वसूल होणार असून त्या प्रवाशांना पुढील स्थानकात उतरविण्यात येणार आहे.



मध्य रेल्वे मार्गावर सीएसएमटी, दादर, एलटीटी आणि पनवेल ही प्रमुख चार टर्मिनल आहेत. या चार टर्मिनलहून दररोज सुमारे १०० मेल-एक्सप्रेस गाड्या देशाच्या विविध भागाकरिता चालविण्यात येतात. बऱ्याचदा मेल-एक्सप्रेसचे प्रवासी विनातिकिट आरक्षित डब्यातून प्रवास करण्याचा प्रयत्न करतात. यामुळे आधी तिकिट काढून आरक्षित केलेल्या प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागतो. याशिवाय अनेकदा आरक्षित प्रवासी आणि तिकिट नसलेल्या प्रवाशांमध्ये वाद होतात. विना तिकिट प्रवाशांमुळे रेल्वेचा महसूल देखील बुडतो. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी मध्य रेल्वेने मेल-एक्सप्रेसमध्ये विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांना कडक कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे.

पूर्वी तिकिट नसलेला प्रवासी टीसीकडे दंड भरुन प्रवास करु शकायचा. परंतु आता ज्या प्रवाशाकडे वैध तिकिट नसेल त्या प्रवाशाला पुढच्या स्थानकात उतरविण्यात येणार आहे. तसेच प्रवाशाकडून सरसकट दंड न घेता त्याने प्रवास केलेल्या स्थानकादरम्यानचाच दंड आकारण्यात येणार आहे. यामुळे प्रवाशांची मोठी अडचण होणार आहे. कारण प्रवाशाला जर मधल्या कुठल्या स्थानकात उतरविले तर त्याला प्रवासाकरिता वेगळ्या गाडीची सोय करावी लागणार आहे. त्यातच जर रात्रीच्या वेळी प्रवाशाला मधल्या स्थानकात उतरविले तर त्याची मोठी गैरसोय होणार आहे. त्यामुळे गैरसोय टाळण्यासाठी प्रवाशांनी मेल-एक्सप्रेसचे वैध तिकिट घेउनच प्रवास करावा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.






## संपादकीय....

# सभापती पदामागचे राजकारण

अठराव्या लोकसभेत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यामुळे नव्या लोकसभेचा सभापती कोण असेल याची चर्चा सुरू झाली. या पदासाठी २६ जून रोजी निवड होऊ शकते.

नियमानुसार सदस्य उमेदवारांच्या समर्थनाच्या प्रस्तावासाठी एक दिवस आधी दुपारी बारा वाजेपर्यंत नोटीस देऊ शकतात. नवनिर्वाचित अठराव्या लोकसभेची पहिली बैठक २४ जून रोजी होईल आणि त्यानंतर दोन दिवसांनी सभापतींची निवडणूक होईल. आजच्या दुभंगलेल्या राजकीय जीवनात 'लोकसभेचा सभापती' तसेच 'विधानसभेचा सभापती' या पदांना अतोनात महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रजासत्ताक भारताच्या सुरुवातीच्या दोन दशकांत या पदांना एवढे महत्त्व नव्हते. याला दोन बाजू आहेत. पहिली बाजू म्हणजे तेव्हा पंडित नेहरू, इंदिरा गांधींच्या काळात काँग्रेस या सत्तारूढ पक्षाकडे साधे बहुमतच नाही तर दणदणीत बहुमत असायचे आणि विरोधी पक्षांकडे अगदीच कमी खासदार, आमदारसंख्या असायची. त्यामुळे त्याकाळचे विरोधी पक्ष पक्षांतर घडवून काँग्रेसची सरकारं अस्थिर करण्याचा विचारसुद्धा करू शकत नसत.दुसरी बाजू म्हणजे तेव्हाची राजकीय संस्कृतीने आजसारखा निचांक गाठला नव्हता. म्हणून त्या काळी लोकसभा, विधानसभेचा सभापती कोण होणार आहे वगैरे चर्चा होत नसे.

भारताच्या विसाव्या शतकातील इतिहासाचा धांडोळा घेतला तर असे दिसून येते की हे पद १९१९च्या भारत सरकार कायद्याखाली पहिल्यांदा अस्तित्वात आले. त्यानुसार १९२१ साली फ्रेडरिक व्हेट यांची सभापती आणि सच्चिदानंद सिन्हा यांची उपसभापतीपदावर नेमणूक करण्यात आली होती. १९२५ साली विठ्ठलभाई पटेल हे पहिले भारतीय सभापती झाले. त्यांना सदस्यांनी निवडून दिले होते. प्रजासत्ताक भारतातील पहिले सभापती म्हणजे जी. व्ही. मावळणकर. ते शिस्तीबद्दल, सभापतीपदाच्या अधिकारांबद्दल अतिशय काटेकोर होते. संसदीय लोकशाहीत सभागृहात सभापतींना पंतप्रधानांपेक्षा जास्त मान आणि अधिकार असतात. एकदा पंडित नेहरूंनी मावळणकरांना पंतप्रधानांच्या कार्यालयात भेटायला बोलावले. पण मावळणकरांनी नम्रपणे नकार तर दिलाच शिवाय ब्रिटीश लोकसभेतील परंपरा उद्धृत करून जाणीव करून दिली की सभापतींनी पंतप्रधानांना असे भेटायला जाणे योग्य नव्हे. पंडित नेहरू हाडाचे लोकशाहीप्रेमी. त्यांनी ताबडतोब मावळणकरांची माफी मागितली आणि स्वतः भेटायला गेले.

अशी तेव्हा राजकीय संस्कृती होती. म्हणूनच घटना समितीत पक्षांतरबंदी कायदा असावा का, यावर चर्चा झाली नाही. पण नंतर भारतातील राजकीय संस्कृती झपाट्याने बदलत गेली. राजीव गांधींनी १९८५ साली पक्षांतर बंदी कायदा आणला. त्यामुळे या पदांचे महत्त्व अतोनात वाढले. राजीव गांधींनी चांगल्या हेतूने हा कायदा केला होता. पण आपल्या देशातील अनेक चांगल्या कायद्यांत जसे यथावकाश अपप्रवृत्ती शिरतात तसेच पक्षांतरबंदी कायद्याबद्दलही झाले. सत्तारूढ पक्ष किंवा आघाडी सभापतीपदाचा सर्रास गैरवापर करू लागला. आज आपल्याला भेडसावत असलेल्या या समस्येचे मूळ पक्षांतरबंदी कायद्यात आढळते. स्वतंत्र भारतात १९५२ सालापासून पक्षीय स्पर्धेचे व निवडणुकांचे राजकारण सुरू झाले. १९५२ ते १९८५ दरम्यान भारतात केंद्रात व अनेक राज्यांत मोठ्या प्रमाणात पक्षांतरं होत असत.

तसे पाहिले तर हा प्रकार जगभरच्या लोकशाहीत होत असतो. पण आपल्याकडे मात्र पक्षांतरं अनेक आमिषांसाठी केली जात असतात. या संदर्भात कुप्रसिद्ध प्रकार म्हणजे १९७०च्या दशकात हरियाणा राज्यातील 'आयाराम गयाराम' प्रकरण! या आमदाराने २४ तासांत चारपाच वेळा पक्षांतर केले होते. तेव्हा जागतिक पातळीवर भारतीय लोकशाहीची थट्टा केली जात असे. पाश्चात्य वृत्तपत्रे भारतीय लोकशाहीतील सतत होणाऱ्या पक्षांतरांवर यथेच्छ टीका करत असत.

जेव्हा राजीव गांधी पंतप्रधानपदी आले तेव्हा त्यांनी तातडीने हा प्रकार थांबवण्यासाठी पक्षांतरबंदी कायदा पास केला. यामुळे पक्षांतरांना काही काळ आळा बसला पण लवकरच आपल्या राजकारणी वर्गाने या कायद्याची थट्टा सुरू केली. हे शक्य झाले याचे महत्त्वाचे कारण म्हणजे आमदार खासदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार सभापतींना देण्यात आला. आपल्या देशात सभापती म्हणजे सत्तारूढ पक्षाचा ज्येष्ठ नेता. सभापतिपदावर बसलेल्या व्यक्तीने क्रिकेट सामन्यातील पंचाप्रमाणे निःपक्षपाती असावे अशी अपेक्षा असते. मात्र सत्तारूढ पक्षाचा ज्येष्ठ नेता असलेली व्यक्ती सभापतिपदावरूनही पक्षीय राजकारण करताना दिसते. एवढेच नव्हे तर आमदार/खासदारांना अपात्र ठरवणारा अधिकार फार सैलपणे वापरून जमेल तसे व जमेल तेव्हा सत्तारूढ पक्षाला सभागृहात मदत करत असते.

याचे अलीकडच्या काळातील वादग्रस्त उदाहरण म्हणजे मे २०१८ साली कर्नाटकात घडलेली घटना. मे २०१८ मध्ये झालेल्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकांत कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते. भाजपाला १०४, काँग्रेसला ८० तर जनता दल (निधर्मी)ला ३७ जागा मिळाल्या होत्या. भाजपाधुरिण या ना त्या प्रकारे बहुमत गोळा करण्याच्या प्रयत्नात असतानाच काँग्रेसने जनता दलाला पाठिंबा देत सरकार बनवले. सर्वात जास्त आमदारसंख्या असूनही भाजपाला हात चोळत बसावे लागले होते. तेव्हापासूनच भाजपा हे सर्व अस्थिर करण्याचे प्रयत्न करेल हे स्पष्ट दिसत होते.

एका वर्षानंतर म्हणजे जुलै २०१९ मध्ये काँग्रेस– जनता दल युतीतील एकूण सतरा आमदारांनी राजीनामे दिले. लक्षात घ्या : राजीनामे दिले, पक्षांतर केले नव्हते. राजीनामे देणे हा न्याय्य मार्ग आहे. सतरा आमदारांच्या राजीनाम्यानंतर कुमारस्वामींचे सरकार अल्पमतात गेले व अपेक्षेनुसार भाजपाने सरकारच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणला. वर उल्लेख केल्याप्रमाणे अशा स्थितीत सभापती जरी निःपक्ष असावा असे अपेक्षित असले तरी अशा आणीबाणीच्या प्रसंगी सभापती सत्तारूढ पक्षाला मदत करतात. २३ जुलै २०१९ रोजी मतदानास आलेला विश्वासदर्शक ठराव मुख्यमंत्री कुमारस्वामी जिंकू शकले नाही व त्यांचे सरकार कोसळले. त्यानंतर राज्यपालांनी २६ जुलै रोजी भाजपाचे नेते येडीयुरप्पा यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ दिली. दरम्यान २५ व २८ जुलै रोजी सभापती रमेश यांनी दोन हुकुमांद्वारे त्या सतरा आमदारांना निलंबित केले व २०२३ सालापर्यंत निवडणूक लढवण्यास मज्जाव केला.

या आमदारांनी सभापतींच्या निर्णयाच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. हे घडले तेव्हा कर्नाटकात काँग्रेस व जनता दल (सेक्युलर) यांचे आघाडी सरकार सत्तेत होते. या सरकारला काठावरचे बहुमत होते.

# कथा संविधान-बदल आणि इतर खऱ्या-खोट्या कथानकांची



लोकसभा निवडणुकीचा निकाल लागून १५ दिवस झाले. भाजपच्या नेतृत्वाखाली केंद्रात पुन्हा रालोआचे सरकार स्थापन झाले. हा निकाल विरोधी पक्षांसाठी आश्चर्यकारक होता, तर सत्ताधारी पक्षांसाठी धक्कादायक होता. भाजपचा हा विजयातील पराभव किंवा पराभवातील विजय असेही या निकालाचे वर्णन केले जात आहे. केंद्रात एक हाती सत्ता, अनेक राज्यांत सरकारे, देशभर मजबूत संघटन अशा ताकदवान भाजपने 'अबकी बार चारसो पार'चा नारा दिल्यानंतर 'चारशे पार' होणारच, असेच जणू तथाकथित राजकीय विश्लेषक, माध्यमे गृहित धरत होते. म्हणजे सत्तेवर तर येणारच, फक्त जागा किती एवढाच काय तो प्रश्न, असा मैदानात उतरतानाच भाजपने मानसिक खेळ सुरू केला. हेच या निवडणुकीत भाजपनेच रचलेले व प्रचारात आणलेले पहिले कथानक म्हणता येईल.

कारभार सुसंगत आहे का? भाजपच्या 'चारसो पार'च्या घोषणेचा तसा सुरुवातीला फार परिणाम झाला नाही, परंतु पुढे त्याच पक्षाचे खासदार व माजी केंद्रीय मंत्री अनंत हेगडे यांच्या संविधान बदलण्यासाठी भाजपप्रणित रालोआला ४०० हून अधिक खासदारांची गरज आहे, अशा वक्तव्याने वादाचा धुरळा उडाला. काँग्रेस व इंडिया आघाडीच्या हातात मग भाजपच्या विरोधात एक मजबूत मुद्दा मिळाला. त्याचा धारदार शस्त्रासाराखा वापर करून विरोधी पक्षांनी विशेषतः काँग्रेसने भाजपला निवडणुकीच्या मैदानात जेरीस आणले. शेवटी शेवटी तर संविधान बदलाच्या विरोधकांच्या आरोपाच्या माऱ्यापुढे भाजपला बचावात्मक पवित्रा घ्यावा लागला.

विरोधकांनी संविधान बदलाचे खोटे कथानक रचून दलित व अन्य समूहांना भ्रमित करून मते मिळविली असा आरोप भाजपच्या महाराष्ट्र व राष्ट्रीय स्तरावरील प्रमुख नेत्यांकडून आता केला जात आहे. पण या निवडणुकीत कथानक युद्धच सुरू झाले होते. भाजपने 'चारसो पा'रचा नारा दिला, कारण त्यांना संविधान बदलायचे आहे, असा हल्ला चढविण्यास 'इंडिया' आघाडीच्या नेत्यांनी सुरुवात केली, त्यावेळी काँग्रेसच्या सरकारच्या राजवटीतच ८० वेळा संविधान बदलेले गेले, असा प्रतिहल्ला भाजपकडून केला जाऊ लागला. मात्र भाजपचे हे कथानक तकलादू होते, कारण संविधान बदलणे आणि संविधानात दुरुस्ती करणे यात मूलभूत फरक आहे. कालानुरूप व लोकहितासाठी आवश्यकतेनुसार संविधानात सुधारणा करण्याची तरतूद ३६८ व्या अनुच्छेदात करण्यात आली आहे. त्यामुळे या पूर्वी ज्या झाल्या त्या घटना दुरुस्त्या होत्या, त्या काँग्रेसच्या काळातही झाल्या व अलिकडे भाजप सरकारच्या राजवटीतही झाल्या. त्याला संविधान बदलले असे म्हणता येणार नाही.

देशातील जमिनदारी पद्धती कायद्याने नष्ट करून कुळांना शोषणमुक्त करण्यासाठी १९५१ मध्ये पहिली घटना दुरुस्ती झाली. त्याचवेळी अनुसूचित जाती, जमाती व समाजातील दुर्बल घटकांना सामाजिक न्याय देण्याची सुस्पष्ट तरतूद करण्यात आली, अशा घटनादुरुस्तीला भाजप संविधान बदलले असे म्हणणार आहे का आणि त्याला त्यांचा विरोध आहे का. हा प्रश्न आहे. मुळात संविधान मान्य असेल तर संविधानाशी सुसंगत आपला राज्यकारभार आहे का, हे भाजपने तापसणे आवश्यक आहे. त्यानंतर विरोधकांनी निवडणुकीत संविधान बदलाविषयी रचलेली कथानके खरी की खोटी याचा निकाल लावता येईल.

हा मूलभूत तत्त्वांचा आदर? लोकसभा निवडणूक प्रचारात भाजपने काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील काही मुद्द्यांचा संविधान बदलाच्या प्रचाराचा प्रतिवाद करण्यासाठी किंवा प्रतिहल्ला करण्यासाठी वापर करण्याचा प्रयत्न केला. उदाहरणार्थ मंगळसूत्र, संपत्तीचे वाटप वगैरे. त्यावर खूप बोलले, लिहिले गेले आहे, त्यामुळे अधिक चर्चा करण्याची गरज नाही. भाजपच्या विशेषतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तोंडून वदले गेलेले हे कथानक अगदीच पोकळ ठरले. त्याचा काहीच परिणाम भाजपच्या बाजूने झाला नाही. मुद्दा असा आहे की, सत्तेवर बसलेले सरकार कोणत्याही पक्षाचे असो, संविधानाच्या चौकटीच्या बाहेर जाऊन कोणालाही राज्यकारभार करता येणार नाही. संविधान मान्य असेल तर मग संविधानविरोधी कायदे कसे केले जाऊ शकतात? उदाहरणार्थ २०१९ चा नागरिकत्व दुरुस्ती कायदा. भाजपने मजबूत बहुमताच्या जोरावर हा कायदा संसदेत मंजूर केला. देशात त्याचा अंमलही सुरू झाला. अफगाणिस्तान, पाकिस्तान व बांगलादेशातील मुस्लीम धर्मीयांना वगळून इतरांना भारताचे नागरिकत्व देण्यासंबंधीचा हा कायदा आहे. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व स्वीकारलेल्या नव्हे तर हेच मूलभूत तत्व किंवा ढाचा असलेल्या संविधानाशी सुसंगत हा कायदा आहे का? तरीही असा कायदा करून एकाच धर्माला वेगळे काढण्याचा भाजप सरकारचा नेमका काय उद्देश होता? आम्ही संविधान बदलणार नाही, आम्ही संविधान मानतो, परंतु त्यातील मूलभूत तत्त्वे आम्ही धुडकावून लावतो, हाच भाजप सरकारच्या या सत्य कथानकाचा अन्वयार्थ नाही काय?

निकाल लागल्यानंतर आता काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर फार चर्चा करण्याचे कारण नाही. परंतु भाजपने काँग्रेसला खिंडित गाठण्यासाठी त्यांच्या जाहीरनाम्याचा हवाला देऊन संपत्ती वाटपाचा एक मुद्दा हाताशी घेतला. काय तर काँग्रेस सत्तेवर आल्यावर हिंदूंची संपत्ती काढून घेऊन ती मुस्लिमांना वाटणार वगैरे, त्यावरून भाजपने बरेच रान उठवले होते, हे सर्वांना माहीत आहेच. त्या कथानकाच्या फार तपशीलात न जाता, भारतीय समाजातील आर्थिक विषमता कमी करण्यासाठी कायदेशीर उपाययोजना करण्याची तरतूद संविधानाच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये आहे. राज्य हे विशेषतः केवळ व्यक्ती–व्यक्तींमध्येच नव्हे तर, निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या किंवा वेगवेगळ्या व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसमुहांमध्येदेखील, उत्पन्नाच्या बाबतीत असलेली विषमता किमान पातळीवर आणण्यासाठी झटून प्रयत्न करील आणि दर्जा, सुविधा व संधी यांच्या बाबतीत असलेली विषमता नाहीशी करण्यासाठी प्रयत्नशील राहील. पुढे म्हटले आहे की, आर्थिक यंत्रणा राबविताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादनाच्या साधनांचा जनसामान्यास अपायकारक होईल, अशा प्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये. ही आहेत संविधानातील राज्ययंत्रणेसाठी मार्गदर्शक तत्त्वे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव आपण साजरा केला, आता शताब्दीकडे वाटचाल सुरू आहे. मुस्लीम धर्मियांचा आणखी किती काळ द्वेष करणार, अजून किती काळ त्यांना संशयाच्या पिंजऱ्यात उभे करणार? सारे भारतीय म्हणून आपण एक आहोत, ही एकीची भावना मनात ठेवणे व ती जागवणे हे राज्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. निवडणूक प्रचारात ते दिसले नाही, हे चिंताजनक आहे.

संविधान बदलाच्या मुद्द्यावर भाजपच्या विरोधात मतदान कोणी केले किंवा इंडिया आघाडीच्या बाजूने कोणी मतदान केले तर त्याबद्दल दलित समाजाकडे बोट दाखविले जाते. संविधान बदलणार या विरोधकांच्या खोट्या प्रचाराला दलित समाज बळी पडला व त्याने भाजपच्या विरोधात मतदान केले असाही त्याचा अर्थ निघतो किंवा काढला जाऊ शकतो. आता दलित समाज कोण किंवा भाजप व त्यांच्या मित्र पक्षांना अभिप्रेत असलेल्या दलित समाजाने विरोधात मतदान केले असे त्यांचे विश्लेषण असेल तर, ते चुकीचे आहे. गुप्त मतदान पद्धतीत कुणी कुणाला मते दिली हे स्पष्टपणे कोणी कसे काय सांगू शकते, हा एक प्रश्न. दुसरे असे की, दलित समाजाला अजूनही अडाणी ठरविता काय, त्यांना राजकारणात काय चालले आहे, हे समजत नाही, असा या पराभूत विश्लेषकांचा दावा आहे काय? दलितत्वाच्या पलीकडे आंबेडकरवाद दुसरा मुद्दा असा की, दलितत्वाच्यापलीकडे आंबेडकरवाद आता सर्व समाजांतील लोकशाहीवादी, संविधानवादी लोक स्वीकारू लागले आहेत. या निवडणुकीत आंबेडकरवादी, लोकशाहीवादी, धर्मनिरपेक्ष विचारांच्या मतदारांनी हुकूमशाही व धार्मिक ध्रुवीकरणाच्या किंवा धार्मिक द्वेषाच्या विरोधात मतदान केले आहे. निवडणुकीच्या मैदानात न उतरता हा सुज्ञ नागरिकांचा वर्ग बिगर राजकीय मंचावर उघडपणे सक्रीय होता, त्याचे प्रतिबिंब निवडणूक निकालात पहायला मिळाले.

महाराष्ट्रातील सत्ताधारी पक्षांकडून आता नवीन कथानके पुढे आणली जात आहेत. सरकारविरोधात काम करणाऱ्या काही संस्थांमध्ये नक्षलवादी शिरले आहेत, असा आरोप खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. हे नवीन कथानक नाही, तर जुन्याच कथानकाची ही दुसरी आवृत्ती आहे. जानेवारी २०१८ मध्ये भीमा कोरेगाव दंगलीनंतर शहरी नक्षलवादाचे कथानक पुढे आणले गेले. त्या वेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते आणि आताचे मुख्यमंत्री शिंदे त्यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. भीमा कोरेगाव दंगल, एल्गार परिषद ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत, त्यावर भाष्य करणे उचित होणार नाही. परंतु या देशातील आंबेडकरवादी कार्यकर्ता कधीही नक्षलवादाचेच काय, परंतु कोणत्याही प्रकारच्या हिंसेचे समर्थन करणार नाही. प्रस्तुत लेखकानेही सातत्याने नक्षलवादाच्या विरोधात लेखन केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय समाजापुढे मार्क्सवादाला पर्याय बुद्ध ठेवला, तो पर्याय ज्यांनी स्वीकारला, तो मार्क्सवादच नाकारतो तिथे नक्षलवादाचे समर्थन करण्याचा प्रश्न येत नाही. अर्थात नक्षलवाद्यांचा कुठे शिरकाव झाला असेल तर, सरकारकडे सर्वप्रकारची भक्कम यंत्रणा आहे, त्यांचा शोध घ्यावा व कायदेशीर कारवाई करावी, परंतु त्याआडून सरसकट घटनात्मक मार्गाने सामाजिक परिवर्तनाची भूमिका घेणाऱ्या आंबेडकरी चळवळीला बदनाम करण्याची ही कथानके खरी समजायची की खोटी, यावरही एकदा चर्चा झाली पाहिजे.

महाराष्ट्रात २००६ मध्ये घडलेल्या खैरलांजी हत्याकांड प्रकरणाने सारा देश हादरला होता. राज्यात त्याची हिंसक प्रतिक्रिया उमटली होती. काही ठिकाणी जाळपोळ झाली. त्यावेळी या भयानक जातीय अत्याचाराच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या आंबेडकरवादी, पुरोगामी संघटनांच्याबाबतीत असाच संशय व्यक्त केला होता. ४ डिसेंबर २००६ रोजी नागपूर येथे विधानसभेत खैरलांजी प्रकरणाबाबत स्थगन प्रस्तावावर चर्चा झाली होती. त्यावेळी भाजपचे नेते गोपीनाथ मुंडे यांचे भाषण अख्खे सभागृह मंत्रमुग्ध करणारे ठरले. हिंसक आंदोलनाचा निषेध करताना ते म्हणाले होते की, हजारो वर्षे ज्यांनी वर्ण व्यवस्था, जाती व्यवस्थेचा अन्याय सहन केला, त्यांच्यावर अजूनही अत्याचार होत असतील तर, हा समाज आक्रमक होणारच, परंतु त्यांच्या देशनिष्ठेबद्दल कुणीही शंका घेऊ शकणार नाही. लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण करताना भाजप नेत्यांनी मुंडे यांच्या त्या भाषणाचे जरूर अवलोकन करावे आणि त्यातून काही बोध घेता आला तर पहावा.

शेवटी संविधान बदलाच्या कथानकाची चर्चा या आधीही भाजपचे सरकार असतानाच झाली होती. देशाचे दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील भाजपप्रणित रालोआ सरकारने २००० मध्ये सर्वोच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश एम. एन. व्यंकटचलय्या यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाची समीक्षा करण्यासाठी आयोग स्थापन केला होता आणि २००२ मध्ये आयोगाने आपला अहवालही सादर केला होता. त्यावेळीही संसदेत आणि संसदेच्याबाहेरही विरोधी पक्षांनी भाजपला टीकेचे लक्ष्य केले होते. पुढे २००४ मध्ये लोकसभा निवडणुकीत 'इंडिया शायनिंग'चा फुगा फुटला, भाजपचा पराभव झाला, सत्ता गेली, संविधान समीक्षेचा अजेंडाही बारगळला. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत भाजप सत्तेवर असतानाच संविधान बदलाचा विषय पुढे आला, त्याचा जबर फटकाही भाजपलाच बसला. संविधान समीक्षा काय, संविधान बदलणे काय किंवा संविधानिक मूल्ये नाकारणे काय या साऱ्याचा अर्थ एकच होत नाही काय? त्यावरून संविधान बदलाचे कथानक खरे की खोटे हेही आपणास ठरवता येईल!

# अमेरिकेपेक्षा भारतात- भिवंडी आणि हरियाणात 'जूनटीन्थ'ची गरज आहे

'सध्या उन्हाळा आहे, तुम्ही जेव्हा मोबाइलवरून काही वस्तू किंवा खाद्यपदार्थ मागवता, तेव्हा त्या घेऊन येणाऱ्यांना पाणी तरी विचारा' – असा माणूसकी जागवणारा संदेश सध्या फॉरवर्ड होतो आहे. तो खरोखरच माणुसकीचा संदेश आहे, पण मेझॉन, झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट आदी प्सवरून आपल्या 'ऑर्डर' आपल्यापर्यंत आणून पोहोचवणारे, किंवा त्यासाठी गोदामांमध्ये काम करणारे सर्वजण केवळ अशा माणूसकीने सुखावणार आहेत का? त्यांचे हाल थांबणार आहेत का? अगदी अलीकडे– चार दिवसांपूर्वी – 'इंडियन एक्स्प्रेस'ने एक बातमी दिली. हरियाणात मेझॉनच्या गोदामांमध्ये काम करणाऱ्यांना 'टार्गेट' पूर्ण करण्यासाठी शपथ घ्यावी लागते– मी पाणीही न पिता, लघवीलाही न जाता आधी माझ्या हातातले काम पूर्ण करेन!



या शपथेची माहिति गोदामातल्या कामगारांनीच इंडियन एक्स्प्रेसच्या पत्रकार ऐश्वर्या राज यांना दिली. माल उतरवण्याचे मोठे काम आले– एकाच वेळी २४ ट्रकचा ताफा गोदामात दाखल झाला, की 'शपथेवर' काम केले जाते. हे झाले माल उतरवणाऱ्या 'इनबाउंड टीम'बद्दल. पण दररोज गोदामातला माल बाहेर पोहोचवणाऱ्यांना तर रोजच या प्रकारची शपथ घ्यावी लागते. मात्र याचा इन्कार संबंधित कंपन्या करतात. याविषयी 'मेझॉन'च्या अधिकाऱ्यांनी, 'आमच्या नोकरवर्गाशी कोणी अशा प्रकारे वागत असेल तर त्याची चौकशी करून कारवाईदेखील करू अशी ग्वाही 'इंडियन एक्स्प्रेस'च्या प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे. पण प्रश्न इतकाच आहे की, हरियाणाच्या गुडगावनजीक असो की महाराष्ट्रातल्या भिवंडीत– गोदामांमध्ये काम करणारे हे तरुण तांत्रिकदृष्ट्या मेझॉन वा फ्लिपकार्टसारख्या कंपन्यांचे 'नोकर' असतात का? हरियाणातील गोदामे या मजुरांना आणि मालवाहतूक करणाऱ्यांना 'नोकर' असा दर्जाच न देता 'पार्टनर' असे म्हणतात. हे 'पार्टनर' म्हणजे जणू, आपापली सेवा देण्यासाठी एकेका दिवशी आपखुशीने आलेले लोक! या पार्टनरांची पिळवणूक प्रत्यक्षात मजुरांहूनही जास्त होऊ शकते. 'आम्ही गुलामासारखेच' असे यापैकी अनेकजण बोलूनही दाखवतात. पण कामगार कायद्यांना आणि माणूसकीलाही बगल देणारा हा 'पार्टनरां'च्या पिळवणुकीचा प्रकार कॉर्पोरेट विश्वातसुद्धा 'एचआर इनोव्हेशन' म्हणून (मनुष्यबळ व्यवस्थापनातला नवप्रयोग म्हणून) खपून जातो!

माल उतरवणाऱ्यांपैकी एका २४ वर्षांच्या तरुणानं त्याचे कामाचे तास दहा असल्याचे सांगितले. एवढे राबून त्याला पगार किती मिळतो? महिना १० हजार ८०० रुपये खिशात पडतात. तो नोकर नाही– कर्मचारी वा कामगार म्हणून कंपनीने त्याला नेमलेले नाही. तो 'पार्टनर' आहे!

मेझॉनचे अमेरिकी मालक जेफ बेझोस हे २०० बिलियन डॉलरचे (साधारण १.७ लाख कोटी रुपयांचे) धनी. त्यांनी आता 'मेझॉन'मधून लक्ष काढून घेऊन, श्रीमंतांसाठी 'अवकाश सहलीं'ची सेवा सुरू केलेली आहे. त्यांना या प्रकारांची कल्पना नसेलच, असे समजण्यात अर्थ नाही, कारण पाश्चात्त्य देशांमध्येही 'मेझॉन'च्या गोदामांत काम करणाऱ्यांची अवस्था 'असुरक्षित' असल्याबद्दल किमान सहा खटल्यांत या कंपनीला समज मिळालेली आहे.

गॅरंटीड डिलिव्हरी, त्वरीत वर्गीकरण अशी कामे पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणात श्रमिकांचे संयोजन हवे. हरियाणासारख्या राज्यांतील वाढती ग्रामीण बेरोजगारी ही भारतात सुरू असलेल्या या कॉर्पोरेट 'नवप्रयोगां'च्या पथ्यावरच पडते. डिलिव्हरी पार्टनरांना नोकरीची सुरक्षितता नसली तरी ते आला दिवस ढकलतातच. हे 'भागीदारी' मॉडेल जागतिक स्तरावर 'उबर'द्वारे सर्वात जास्त वापरले गेले आहे. थोडक्यात, श्रमिकांसाठी खर्च कमीत कमी करायचा आणि त्याच वेळी या श्रमिकांना 'पार्टनर' म्हणून जास्तीत जास्त तास काम करायला भाग पाडायचे – किंवा 'एमबीए' लोकांच्या भाषेत, 'प्रोत्साहित' करायचे– असा हा मामला आहे. तो अर्थातच आता भारतात रुळतो आहे. आपल्याला कोणत्याही शहरांच्या नाक्यानाक्यांवर स्विगी/झोमॅटोचे टीशर्ट घातलेले 'गिग वर्कर्स' दिसू लागले आहेत. वाहने खरेदी करण्यासाठी ते खर्चात पडतात, मग तो खर्च भागवण्यासाठी 'गिग वर्कर' म्हणून आणखी–आणखी काम करतात.

भारतात मजूर कमी दराने मिळतात, म्हणूनच पिळवणुकीची शक्यता वाढते. पण अर्थशास्त्रज्ञांचा एक गट अजूनही या वास्तवाकडे पाहात नाही. 'कामच नसण्यापेक्षा काही तरी काम बरे' असा युक्तिवाद ते करतात आणि वर, समाजातल्या श्रीमंतांची संख्या वाढली तर उपभोगही वाढेल, तेवढीच वस्तू– सेवांची मागणीही वाढेल आणि तेवढेच चार पैसे या गरीब मजुरांच्याही खिशात जातील, अशा जुन्यापुराण्या 'झिरपा सिद्धान्ता'चा (ट्रिकल डाउन थिअरी) आधार हे बाजारवादी आणि प्रस्थापितवादी अर्थशास्त्रज्ञ घेतात! पण एकतर हा झिरपा सिद्धान्त खरा ठरत नाही हेच विषमता वाढण्याचे कारण आहे आणि दुसरे म्हणजे, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपासून जगभरात 'कामगारांच्या हक्कां'साठी लढे सुरू झाले. त्यातून झालेल्या राजकीय क्रांत्या फसल्या आहेत, पण कामगारांना माणूसकी दाखवायला हवी हे मान्य करूनच आपल्या भांडवलशाहीची प्रगती झालेली आहे.

'व्हॉट वेंट रॉंग विथ कॅपिटॅलिझम' हे गुंतवणूकदार रुचिर शर्मा यांचे नवे पुस्तक अमेरिकेतल्या कॉर्पोरेट विश्वाची चिकित्सा करणारे आहे. कंपन्यांचे एकत्रीकरण आणि तोट्याचे सामाजिकीकरण (बेलआउट आणि मालकधार्जिण्या कायद्यांद्वारे) हे अखेर विषमता वाढवणारे ठरते आणि वाढती विषमता हे रोगट भांडवलशाहीचे महत्त्वाचे लक्षण आहे, असे प्रतिपादन ते करतात. यासंदर्भात ते एके ठिकाणी हेन्री फोर्डचे उदाहरण देतात. जेफ बेझोस किंवा 'झोमॅटो'चे संस्थापक दीपिंदर गोयल यांच्याप्रमाणेच, फोर्डनेही विद्यमान तंत्रज्ञान घेतले आणि प्रक्रियेत नवप्रयोग केले – पण फोर्डने नवप्रयोगातून साकार केलेली असेंबली लाइन आजही कायम आहे. याउलट, बेझोस किंवा गोयल या दोघांनी काही जीपीएस किंवा मूलभूत प्रोग्रामिंग भाषांचा 'शोध' लावलेला नाही त्यांनी फक्त वितरणासाठी सुविधांची चौकट उभारली. फोर्डचा आग्रह असा होता की त्याच्या कारखान्यातील कामगारांना ते तयार करत असलेले उत्पादन हप्त्याने तरी खरेदी करता येणे परवडेल, इतका मोबदला मिळावा. आजही तेच म्हणता येईल का? ११ हजार ते १३ हजार महिना दराने, 'शपथ' घेतलेल्यांना काय परवडणार आहे? उत्पादक आणि ग्राहक यांच्या क्रयशक्तीमधील एवढी मोठी तफावत राजकीय, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्याही दीर्घकाळ टिकत नाही.

ज्या अमेरिकेत भांडवलशाहीचे हे 'फोर्ड मॉडेल' उभे राहिले, त्याच देशात १८६५ पर्यंत गुलामीच्या प्रथेला कायदेशीर मान्यता होती. या गुलामांची खरेदीविक्रीही व्हायची. माणूसकीच नाकारणारा हा प्रकार १९ जून १८६५ या दिवशी कायद्याने बंद झाला, म्हणून अमेरिकेत आजही हा दिवस 'जूनटीन्थ' म्हणून सणासारखा साजरा केला जातो. पण आज अशा 'जूनटीन्थ'ची गरज भारताला अधिक आहे. मग ते हरियाणातले मानेसर असो की महाराष्ट्रातली भिवंडी!

# लातूर पोलीस भरती मैदानी चाचणी प्रक्रिया सुरू






लातूर :- लातूर जिल्हा पोलीस दलातील रिक्त पदांसाठीची पोलीस भरती प्रक्रिया आज दिनांक १९ जून रोजी पासून पोलीस मुख्यालय मैदान बाबळगाव येथे सुरू झाली. सदर भरतीत पोलीस शिपाई ३९, पोलीस शिपाई (बँड्समन) ५ व पोलीस शिपाई (चालक) २० असे एकूण ६४ पदाची भरती करण्यात येत आहे. पहिल्या दिवशी भरतीसाठी एकूण ६३७ उमेदवारांना बोलविण्यात आले होते त्यापैकी ४०३ उमेदवार हजर झाले. मैदानी चाचणीत ३३५ उमेदवार पात्र व ६८ उमेदवार अपात्र ठरले. उमेदवारांना प्रवेशद्वाराच्या आत घेतल्यानंतर उमेदवारांचे कागदपत्रे पडताळणी, शारीरिक मोजमाप व त्यानंतर मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. मैदानी चाचणीमध्ये १६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे व गोळा फेक अशा ३ प्रकारात मैदानी चाचणी घेण्यात येत आहे. मैदानी चाचणी पारदर्शक व निष्पक्षपाती पणे होण्यासाठी प्रत्येक चाचणीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे, व्हिडिओ शूटिंग, फोटोग्राफी इत्यादी सुविधांचा वापर करण्यात येत आहे. उद्या दिनांक २० जून रोजी भरतीच्या दुसऱ्या दिवशी एकूण ७७४ उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी बोलविण्यात आले आहे. भरती प्रक्रियेदरम्यान कोणीही आमिषांना बळी पडू नये असा काही गैरप्रकार निदर्शनास आल्यास त्याबाबत तात्काळ पोलीस प्रशासनास अवगत करणे बाबत श्री सोमय मुंडे, पोलीस अधीक्षक, लातूर यांनी उमेदवार व नागरिकांना जाहीर आवाहन केले आहे.

## पोलिस अधीक्षक कार्यालय,लातूर ची धडक मोहिम ८ दिवसातच पळवून नेलेल्या व हरविलेल्या ४ मुलींचा शोध घेण्यात यश

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने मागील ८ दिवसात धडक मोहीम राबवून पळवून नेले बाबत गुन्हा दाखल असलेल्या ३ मुली व हरविल्याची तक्रार दाखल असलेली १ मुलगी अशा एकूण ४ मुलींचा शोध घेऊन त्यांना त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्याची कामगिरी पार पाडली आहे.

बालके, स्त्रिया यांना लैंगिक शोषणासाठी, भीक मागण्यासाठी किंवा इतर बेकायदेशीर कृत्य करण्यासाठी पळवून नेले जात असेल किंवा त्यांना फूस लावली जात असेल अशा प्रकरणांना प्रतिबंध करण्यासाठी तसेच पळवून नेलेले बालके, स्त्रिया यांचा शोध घेऊन त्यांचे पालकांच्या ताब्यात देण्यासाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे सदर कक्ष कार्यरत आहे. याशिवाय वेश्या व्यवसाय, बालकामगार याप्रकरणी देखील या कक्षाकडून संबंधितावर प्रतिबंध व कारवाई करण्यात येते.

लातूर शहर व जिल्ह्यातील पळवून नेलेले बालके व महिला संदर्भात संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाल्यानंतर –क्ष्ण कडून समांतर तपास करून पीडित महिला व बालकांचा शोध घेऊन तपास केला जातो. मागील ८ दिवसात सदर कक्षाने धडक मोहीम राबवून मागील सुमारे २ वर्षापासून व त्या अलीकडील कार्यकाळात जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनला दाखल पळवून नेलेल्या ३ मुली व हरविलेली १ मुलगी यांचा शोध घेऊन संबंधित पालकांच्या



ताब्यात देण्यात आले आहे, तर आरोपींना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरच्या पळवून नेलेल्या मुली पनवेल, नवी मुंबई, उमरगा जि धाराशिव, नळेगाव जि लातूर व कसबे तडवळे जि धाराशिव येथून ताब्यात घेण्यात आल्या आहेत. यात तांत्रिक माहिती व विश्लेषणाच्या आधारे सदर मुलींचा शोध घेण्यात यश आले आहे.

सदरची कामगिरी श्री सोमय मुंडे, पोलिस अधीक्षक, लातूर, श्री अजय देवरे, अपर पोलीस अधीक्षक, लातूर, श्री गजानन भातलवंडे, पोलिस उप अधिक्षक, मुख्यालय यांच्या मार्गदर्शनात श्री दयानंद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक, –क्ष्ण यांच्या अधिपत्याखाली पोलीस उपनिरीक्षक श्री सूर्यवंशी, पोलीस अंमलदार श्री सदानंद योगी, प्रकाश जाधव, मनियार, महिला अंमलदार श्रीमती वंगे व श्रीमती लता गिरी यांच्या पथकाने पार पाडली आहे.

## अनाधिकृत होर्डिंगधारकांसह मालमत्ताधारकांवर मनपा कार्यवाही करणार.

लातूर/प्रतिनिधी:- घाटकोपर मुंबई येथे सोसाटयाचा वारा व वादळामुळे होर्डिंग कोसळुन अपघात होऊन जिवित हानी झालेली आहे. व नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील महादेववाडी पाटीनजीक येथील दिशा व अंतर दर्शविणारा फलक कोसळुन अपघात होऊन जिवित व वित्त हानी झालेली आहे.

त्याअनुषंगाने लातूर शहरातील ज्या खाजगी मालमत्तांवर अनधिकृत होर्डींग्ज लावण्यात आलेले आहेत, सदर होर्डींग्ज हे संपूर्ण स्ट्रक्चरसहीत तात्काळ काढून घेणेसाठी नोटीस देवून मुदत देण्यात आली होती. तथापि अदयापही बरेच होर्डींग्ज न काढल्याचे निदर्शनास येत आहे. तरी सदर होर्डींग्ज हे निदर्शनास आल्यास सदर मालमत्ताधारकांवर व एजन्सीधारकांवर क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत गुन्हा नोंद करण्याची सक्त कार्यवाही करण्याचे आदेश मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेले आहेत. तरी ज्या खाजगी ईमारतीवर अनधिकृत होर्डींग्ज आहेत, त्या तात्काळ काढून घेवून मनपास सहकार्य करावे. सदरील होर्डींग्जमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात झाल्यास सदर मालमत्ता धारकांवर व एजन्सीधारकांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच मनपा मार्फत काढण्यात आलेल्या होर्डींग्जसचा खर्च मालमत्ताधारकांकडून वसूल करण्यात येईल. तसेच मनपाने परवानगी दिलेल्या युनिपोलवरील जाहिरात बॅनर्स बंद करुन वादळी वारे व वादळी पाऊसच्या संभाव्य शक्यतेमुळे फ्लेक्सी व इतर साहित्य काढून मोकळे ठेवणे बाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

## पंतप्रधानांचे सल्लागार सांगून ८३ लाखांना गंडा; एका महिलेसह दोघांना अटक : तिघांची फसवणूक

सातारा : नवी दिल्ली येथील पंतप्रधानांचे राष्ट्रीय सल्लागार असल्याचे खोटे सांगत विविध शासकीय टेंडर मिळवून देतो म्हणून तिघांची तब्बल ८३ लाखांची फसवणूक करण्यात आली.

याप्रकरणी सातारा शहर पोलिसांनी एका महिलेसह दोघांना अटक केली. कश्मिरा संदीप पवार (वय २८, रा. सदर बझार), गणेश हरिभाऊ गायकवाड (रा. शाहूनगर), अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. न्यायालयात हजर केले असता त्यांना एक दिवस पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.



सातारा शहर पोलिस ठाण्यात कश्मिरा पवार व गणेश गायकवाड, या दोघांविरुध्द २०२३ मध्ये गुन्हा दाखल झाला होता. या प्रकणात सातारा शहर पोलिस ठाण्याच्या वतीने तक्रार देण्यात आली आहे. दोन्ही संशयित भारत सरकारच्या गृह विभागाचे, उत्तर प्रदेश राज्याचे टेंडरचे पत्र, लोकसभा सचिवालय येथे कपडे पुरवण्याचे टेंडरचे पत्र दाखवून ते टेंडर मिळवून देतो, असे सांगत होते. यातूनच गोरख मरळ (रा. सहकारनगर, पुणे) यांची ५० लाख रुपयांची, चंद्रशेखर पवार (रा. सातारा) यांची ७ लाख रुपयांची फसवणूक झाली. सातार्यातील फिलीप भांबळ यांची हॉटेल भाडे प्रकरणातून सुमारे २६ लाख रुपयांची फसवणूक झाली. अशाप्रकारे तिघांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ८३ लाख रुपये फसवणूक झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

पोलिस निरीक्षक राजेंद्र मस्के यांनी बुधवारी या प्रकरणाची माहिती घेऊन प्रलंबित गुन्ह्यात या दोघांना तातडीने अटक केली. अशाप्रकारे कोणाची फसवणूक झाली असेल त्यांनी सातारा शहर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस निरीक्षक राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

## संभोगादरम्यान सेक्स टॉय तुमच्या शरीरात अडकल्यास काय होईल? तज्ज्ञांकडून जाणून घ्या

सेक्स या गोष्टीबद्दल आपल्याकडे फारच गोंधळ आहे. सेक्स टॉईजबद्दल उघडपणे बोलले जात नाही. लैंगिक संबंधांदरम्यान सेक्स टॉयचा वापर केला जातो. बर्याच लोकांनी सेक्स टॉयबद्दल माहिती ऐकली असावी, पण कधी याचा उपयोग केला नसावा. बहुतांश लोक सेक्स टॉयचा वापर एकटे असताना करतात. पुरुष असो किंवा महिला, प्रत्येकासाठी बाजारामध्ये सेक्स टॉय उपलब्ध असतात. पार्टनरसोबत सेक्स करताना यादरम्यान आनंद वाढवण्यासाठी सेक्स टॉयचा उपयोग केला जातो.



बाजारात अनेक प्रकारचे सेक्स टॉय उपलब्ध आहेत. बरेच सेक्स टॉय मोबाइलप्रमाणे चार्जदेखील करता येतात. खरं तर हे एक उपकरण आहे, जे महिलांची योनी आणि पुरुषांच्या गुप्तांगांचा आकार लक्षात घेऊन बनवले जाते. तुमच्या गरजेनुसार आणि मनाप्रमाणे याचा वापर करता येऊ शकतो. लैंगिक जीवनात काहीतरी नवीन करून पाहण्यासाठी सेक्स टॉयचा वापर केला जातो. पुरुष असो अथवा महिला, दोघंही सेक्स टॉयचा उपयोग करू शकतात. अनेक लोक आपलं नैराश्य दूर करण्यासाठी सेक्सदरम्यान सेक्स टॉयचा वापर करतात. पण, लैंगिक सुख मिळविण्यासाठी सेक्स टॉय वापरणे आणि त्यावरील नियंत्रण गमावणे हे कधी कधी व्यक्तीच्या चांगलेच अंगाशीही येऊ शकते.

लैंगिक खेळणी लैंगिक आनंद वाढवण्याचा एक मजेदार आणि सुरक्षित मार्ग असू शकतो. तथापि, अपघात होऊ शकतात आणि काहीवेळा सेक्स टॉय योनी किंवा गुदाशयात अडकू शकते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, पुढील अस्वस्थता किंवा दुखापत टाळणे. खेळणी जबरदस्तीने बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्याने फाटणे किंवा चिडचिड होऊ शकते. गुडगाव येथील क्लाउडनाईन ग्रुप ऑफ हॉस्पिटल्सच्या प्रसूती आणि स्त्रीरोग विभागाच्या संचालक डॉ. चेतना जैन यांनी सेक्स टॉय गुदाशयात अडकल्यास परिस्थिती काळजीपूर्वक कशी हाताळायची याविषयी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण सविस्तर जाणून घेऊ सेक्स टॉय तुमच्या शरीरात अडकल्यास काय कराल?

१. शांत राहा : घाबरल्याने परिस्थिती आणखी बिघडू शकते. शांत राहण्याचा प्रयत्न करा आणि परिस्थितीचे मूल्यांकन करा. २. जबरदस्ती करू नका : वस्तूला जबरदस्तीने बाहेर काढण्याचा प्रयत्न करणे टाळा, कारण यामुळे इजा होऊ शकते किंवा ती आणखी आत ढकलली जाऊ शकते. ३. पोझिशन्स बदला : काहीवेळा पोझिशन्स बदलल्याने तुम्हाला मदत होऊ शकते. यासाठी पोझिशन्स बदलण्याचा प्रयत्न करा ४. वैद्यकीय मदत घ्या : जर तुम्ही ती वस्तू काढू शकत नसाल किंवा त्यामुळे वेदना, रक्तस्त्राव किंवा अस्वस्थता येत असेल तर ताबडतोब वैद्यकीय मदत घ्या. स्त्रीरोगतज्ज्ञाशी संपर्क साधा. वैद्यकीय तज्ज्ञांकडे वस्तू सुरक्षितपणे काढण्यासाठी साधने आणि कौशल्य आहे. ५. लक्षणांचे निरीक्षण करा : तीव्र वेदना, रक्तस्त्राव, ताप किंवा संसर्गाची चिन्हे यांसारख्या कोणत्याही लक्षणांकडे लक्ष द्या आणि यापैकी काही आढळल्यास वैद्यकीय मदत घ्या. तथापि, तुमच्या शरीरशास्त्रासाठी आरामदायक आणि योग्य असे सेक्स टॉय निवडा. लैंगिक खेळण्यांशी संबंधित जोखमींबद्दल वैद्यकीयतज्ज्ञ वारंवार सावधगिरी बाळगतात. तसेच वापरकर्त्यांनाही ते अशी खेळणी वापरताना काळजीपूर्वक वापराच्या गरजेवर जोर देतात. ते अशा वस्तू खाजगी भागात ठेवण्याचे संभाव्य धोके हायलाइट करतात, ज्यामुळे गंभीर गुंतागूंत होऊ शकते.

## जर त्वचा सैल होत असेल तर ही जीवनसत्त्वे त्वचा घट्ट ठेवण्यासाठी वरदान ठरतात, जाणून घ्या


आपली त्वचा सुंदर आणि तरुण राहावी अशी प्रत्येकाची इच्छा असते, परंतु कधीकधी वयाच्या आधी त्वचा सैल होऊ लागते. आजकाल जीवनशैली आणि वाढत्या प्रदूषणामुळे त्वचा सैल होऊ लागते. आजच्या लेखात आम्ही तुम्हाला अशाच काही खाद्यपदार्थांबद्दल सांगणार आहोत, ज्यांचा आहारात समावेश केल्यास त्वचा पुन्हा घट्ट आणि सुंदर बनते.

निरोगी त्वचेसाठी जीवनसत्त्वांचे सेवन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. येथे आम्ही त्या जीवनसत्त्वांविषयी सांगत आहोत, जे त्वचा घट्ट ठेवण्यास मदत करतात.

व्हिटॅमिन सी: व्हिटॅमिन सी त्वचेची लवचिकता सुधारण्यास मदत करू शकते, ज्यामुळे त्वचा सैल होण्यापासून प्रतिबंधित होते.

व्हिटॅमिन-ए: व्हिटॅमिन ए त्वचेतील ऊतींना निरोगी ठेवू शकते. याशिवाय वाढत्या वयाचा परिणामही कमी करू शकतो.

व्हिटॅमिन-ई: व्हिटॅमिन ई हे अँटिऑक्सिडंट्समध्ये समृद्ध मानले जाते, ज्यामुळे त्वचेला फायदा होतो. हे कोलेजन पातळी संतुलित करून त्वचेच्या वृद्धत्वाचे परिणाम कमी करू शकते.




व्हिटॅमिन डी: वृद्धत्वाच्या समस्येसाठी देखील व्हिटॅमिन डीचे सेवन करण्याचा सल्ला दिला जातो. हे त्वचेच्या जलद वृद्धत्वाचे परिणाम कमी करू शकते.

आता तुम्हाला चेहऱ्याची त्वचा कशी घट्ट करायची हे समजले असेल. त्वचा घट्ट करण्यासाठी काय खावे हे देखील तुम्हाला माहीत असेलच. वर दिलेल्या सोप्या पद्धतींचा अवलंब करून तुम्ही तुमची सैल त्वचा सहज घट्ट करू शकता. आणि जर तुमच्या समस्येवर उपाय सहज सापडत नसेल तर नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## प्रत्येक स्त्रीमध्ये असतात हे चार दुर्गुण, चाणक्य नीतीमध्ये नमूद

काही क्षेत्रात पुरुषांपेक्षा महिलांना जास्त महत्त्व दिले जाते. स्त्रीची इच्छा असेल तर तिच्यामुळे संपूर्ण कुटुंब आनंदी जीवन जगू शकते. त्याच वेळी, त्यांच्या काही चुकांमुळे, कुटुंबात सतत तणाव आणि दुःखाचे वातावरण असू शकते. आचार्य चाणक्य यांनी त्यांच्या 'नीती शास्त्र' मध्ये स्त्रियांच्या चांगल्या आणि वाईट दोन्ही सवयी आणि दुर्गुण सांगितले आहेत.

आज आम्ही तुम्हाला 'चाणक्य नीति शास्त्र'मध्ये लिहिलेल्या बहुतेक महिलांच्या चार वाईट गोष्टींबद्दल सांगणार आहोत, जे त्यांना जन्मापासूनच असतात. महिलांनी वेळीच या सवयी बदलल्या नाहीत तर त्यांना आयुष्यात पश्चाताप करावा लागू शकतो.

विचार न करता कार्य करणे- आचार्य चाणक्य यांनी त्यांच्या नीती शास्त्र मध्ये सांगितले आहे की, बहुतेक स्त्रिया कोणतेही महत्त्वाचे काम करण्यापूर्वी विचार करत नाहीत, ज्यामुळे त्यांना नंतर पश्चाताप करावा लागतो.

फसविणे- आचार्य चाणक्य यांच्या मते पुरुषांपेक्षा स्त्रिया अधिक कपटी असतात. या दोषामुळे



त्यांना काही वेळा अडचणींचा सामना करावा लागतो.

लालसा करणे- कोणत्याही गोष्टीसाठी लोभी असणे ही एक वाईट सवय आहे. चाणक्याचा असा विश्वास होता की पुरुषांपेक्षा स्त्रियांना जास्त लोभ असतो. महिलांना पैसा, दागिने, कपडे इत्यादी गोष्टींचा जास्त लोभ असतो. या गोष्टींनी त्याचे मन कधीच भरत नाही.

स्वार्थी- बहुतेक महिलांना त्यांचे काम कसे करावे हे माहित असते. प्रत्येक प्रसंगातून ती सहज बाहेर पडते. तथापि ही गुणवत्ता देखील काही परिस्थितींमध्ये दोष बनते. त्यांच्या स्वार्थामुळे त्यांना इच्छा नसतानाही समस्यांना तोंड द्यावे लागते.


अस्वीकरण: येथे दिलेली माहिती धार्मिक ग्रंथांवर आधारित आहे आणि केवळ माहितीसाठी दिली जात आहे. वेबदुनिया याला दुजोरा देत नाही.

# भर पावसाच्या दिवसात.. अतिक्रमणे तात्काळ काढून घेण्याच्या गायरानधारकांना नोटीसा; वंचित बहुजन आघाडीचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

लातूर :- लातूर जिल्ह्यातील अनेक शासकीय/ गायरान जमिनींवरील जमिनधारकांचे अतिक्रमण सात दिवसात काढून घेण्याच्या नोटीसा प्रशासनाने भर पावसाच्या दिवसात काढल्याने संतापाची लाट उसळली असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ही कारवाई त्वरीत स्थगीत करुन अतिक्रमितांपुढे निवास आणि जगण्याचा प्रशासनाने निर्माण केलेला प्रश्न तात्काळ सोडवावा,सदरच्या नोटीसा परत घेण्याचे आदेश संबंधितांना द्यावेत अशी मागणी लातूर जिल्हा वंचित बहुजन आघाडीच्या शिष्ट मंडळाने जिल्हाधिकारी,रेणापूर,लातूर उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फ़त केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, लातूर जिल्ह्यामध्ये अनेक गोरगरीबांनी गेली ३० ते ४० वर्षांखाली आपले घरे केली आहेत. त्यांना इतरत्र कोणत्याही प्रकारचा निवारा नसल्याने ते शासकीय जमिनीवर घरे बांधून आपली निर्वाह करीत आहेत.

गतवर्षीही प्रशासनाने राज्यातील या गायरानधारक/ अतिक्रमितांना अशाच नोटीसा बजावल्या होत्या. त्यामुळे वंचित बहुजन आघाडीने मंत्रालयावर पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड.प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भव्य मोर्चा काढून वरील मागणीसाठी



उपमुख्यमंत्र्यांची भेट घेवती असता सदरील विषयात २० ते २५ वर्षांखालील जुन्या गायरानधारकांना त्यांच्या नावे सातबारा करुन देण्याचे व कोणत्याही प्रकारे गायरानधारकांचे अतिक्रमण उठवण्यात येणार नाही असे आश्वासन देण्यात आले होते.

परंतु लातूर जिल्ह्यामध्ये गायरानधारकांना तात्काळ गायरान जमिनी खाली करण्याच्या नोटीसा उपविभागीय अधिकार्यांनी बजावल्याने या गोरगरीबांच्या निवास व जगण्याचा प्रश्न ऐन पावसाळ्यात निर्माण करण्यात आला आहे.ही अन्यायकारक बाब असून, लातूर जिल्ह्यातील गायरानधारकांना काढण्यात आलेल्या नोटीसा तात्काळ मागे घेण्यात याव्यात अशी मागणीही या निवेदनांती करण्यात आली आहे.

सदरील निवेदनावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव ॲड.रोहित सोमवंशी,लातूर शहराध्यक्ष इंजि.सचिन गायकवाड, लातूर जिल्हा सचिव ॲड.प्रशांत उघाडे, लातूर महिला आघाडी शहराध्यक्षा सुजाता अजनीकर, शाखाध्यक्षा नीता अजनीकर,जिल्हा प्रसिध्दी प्रमुख सुरेश सूर्यवंशी,लातूर शहर आयटीप्रमुख अभय गायकवाड, लातूर शहर उपाध्यक्ष शाकीर शेख, परमेश्वर साळवे, बाबू शेख, रेणापूर तालुकाध्यक्ष खय्युम शेख, सुशील कांबळे,तानाजी कांबळे, विश्वनाथ काळे, भीमराव चिकटे, राजरत्न कांबळे,सुरज कांबळे, लायक शेख,खबरबी शेख, असलम शेख, नागनाथ कांबळे, बाबूमियॉ तोडकर, संपती गायकवाड,सचिन साळवे,भगवान कासारे, नारायण कासारे,व्यंकटी कासारे,देवानंद कासारे,बशीर शेख,नितीन शेटे,रामचंद्र साळवे,निवृत्ती कासारे आदिंची नावे व सह्या आहेत.



शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव खा. अनिल भाऊ देसाई दक्षिण मध्य मुंबई लोकसभा मतदारसंघात विजयी झाल्याबद्दल शिवसेना सह संपर्क प्रमुख तथा महाराष्ट्र राज्य बाजार समितीचे उपसभापती संतोष भाऊ सोमवंशी यांनी सत्कार केला यावेळी खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण , औसा बाजार समितीचे माजी उपसभापती किशोर जाधव, युवासेनेचे जिल्हा प्रमुख दिनेश जावळे, जय मल्हार संघटनेचे जिल्हा प्रमुख सुरेश मुसळे आदी उपस्थित होते

# शेतकरी हवालदिल आकाशाकडे लागले डोळे कोल्ह्याने दिला दगा; मोर तरी तारणार का?

किनवट/शेख शौकत :-किनवट तालुक्यात पाऊसच नाही. मृग नक्षत्रात कोल्हा वाहनाने दगा दिला. आता चार दिवसांवर आर्द्रा आला आहे. आर्द्रा नक्षत्राचे मोर वाहन तरी काळ्या आईला भिजवण्यासाठी जोरदार हजेरी लावून शेतकऱ्यांना तारणार का? असे आकाशाकडे डोळे लागलेले हवालदिल शेतकरी बोलू लागले आहेत. एकीकडे तालुका कृषी विभाग सलग तीन दिवस ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्याशिवाय किंवा जमिनीत ६ इंच ओलावा झाल्याशिवाय कापूस पिकाची लागवड करू नये, असे आवाहन करीत आहे. तर दुसरीकडे एक दोन हलक्या स्वरूपाच्या पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी कापूस पिकाची सरकी टोबण्याला सुरुवात केली असल्याचे चित्र आहे. पाण्याची सोय असलेले शेतकरी कापूस पिकाची लागवड केली आहे. उन्हाच्या तीव्रतेने बोअर, विहिरींनी तळ गाठला असून पाण्याची पातळी कमी झाल्याने कृषी पंपाची मोटर सुरू करताच पाणी आटू लागल्याने मोटारी बंद करण्याची वेळ येत आहे. तर वीज वितरण कंपनीच्या वीजपुरवठा खंडित होण्याने शेतकरी चांगलेच संकटात सापडले आहेत. निसर्गाच्या संकटाबरोबर मानवनिर्मित संकट उभे राहू लागले असल्याने बियाणे वाया जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करू लागले आहेत. अशा परिस्थितीत दुबार पेरणीचे संकट उभे ठाकण्याची भीती आहे. दरम्यान, सलग तीन दिवस ७५ ते १०० मि.मी. पाऊस झाल्याशिवाय किंवा जमिनीत ६ इंच खोल ओलावा झाल्याशिवाय कपाशी लागवड करू नये, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी बालाजी मुंडे यांनी केले आहे. पिकाचे सर्वसाधारण क्षेत्र ५० हजार १८० हेक्टर

खरीप हंगाम २०२४ मध्ये पांढरे सोने म्हणविल्या जाणाऱ्या कापूस या नगदी पिकाचे सर्वसाधारण क्षेत्र ५० हजार १८० हेक्टर आहे. खरिपाच्या पेरणीपूर्व मशागतीची कामे करून शेतकरी काळ्या आईची ओटी भरण्यासाठी सज्ज आला आहे.

पण मृग नक्षत्राच्या कोल्हा वाहनाने दगा दिला अन् बी टोबण्यासाठी सज्ज असलेला शेतकरी पुरता हवालदिल झाला. मृगाने दमदार हजेरी लावली नाही. त्यामुळे पेरण्या खोळंबल्या आहेत. काही शेतकऱ्यांनी हिंमत करून धूळपेरणी केली आहे.

# मनीराम खेड प्रकल्प कोरडा, गेटही तुटले

## पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष, दुघर्टनेची शक्यता

किनवट/शेख शौकत :- माहूर तालुकयातील सिंदखेड, सेलु, करंजी, वायफनी मनिरामथड, वसरामतांडा च्या मध्ये असलेल्या मनिरामखेड प्रकलपाचे मुख गेट तोडून टाकल्याने संपूर्ण प्रकल्पातील पाणी वाहून गेल्याने प्रकल्प कोरडा ठाक पडला आहे मुख्य भिंतीवर मोठ मोठी झाडे वटवृक्ष झाल्याने मुख्य भिंतीवर तडे पडले असुनही पाटबंधारे विभागाचे त्याकडे दुर्लक्ष केल्याने पावसाळयात ही झाडे मोठी होउन त्याची मुळे खोल गेल्यास भिंतीला तडा जाऊन भिंत फुटण्याची शक्यता नाकरता येत नसल्याची भिती नजदीक शेती घर असलेल्या गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे. मराठवाडापाटबंधारेविभागमहामंडळछत्रपतीसंभाजीनगर अंतर्गत मनिरामखेड बृहत लघुपाटबंधारे प्रकल्प माहुर बळीराजा जलसंजिवनी योजने अंतर्गत सदरील धरण बांधण्यात आले असुन या धरणाची लांबी २४०५ पाच मीटर असुन उंची १७.०५ मीटर आहे. या धरणात ११.८६६ दलघमी पाणी साठा राहणार आहे बंद नलीका वीतरण प्रणाली द्वारे परिसरातील १२० हेक्टर जमीनाला या धरणातील पाणी साठा चा लाभ होणार आहे.



बंधनलीका बीतरण प्रणाली द्वारे सिंचनाची सोय करण्यात येत असल्या ची माहिती असुन बंद नलीका टाकण्याचे काम अंतीम टप्यात असल्याची माहिती आहे, परंतु या धरणावर देखरेख साठी सध्या कर्मचारी नसल्यामुळे जमा असलेले पाणी अज्ञात नागरिकांनी त्याचे गेट तोडुन साठवलेले पाणी भरमसाट सोडून दील याने शेतकऱ्यांच्या शेतीला उपयोगात येणारा पाणी साठवलेले पाणी सरळ नालयात वाहून गेल्याने प्रकल्प कोरडा ठाक पडला आहे, तसेच या धरणावरील मुख्य भिंतीवर मोठ मोठी झाडे उगवलयाने मुख्य भिंतीला तडे जाण्याची शक्यता नाकरता येत नाही. नागरिकांनी, तसेच पत्रकारांनी अनेक वेळा या बाबीकडे संबंधित विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला, परंतु अध्याप कुठलीही हालचाल झाली नसल्याने नदिड येथील पाटबंधारे मंडळ राज क्रमांक दोन युनिट च्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी याकडे लक्ष देऊन तात्काळ गेट दुरुस्ती सह उगवलेली झाडे तोडावी अशी मागणी सर्व गांवातील नागरिकांतुन होत आहे.

# डॉ. हनुमंत कराड यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

## दंत आरोग्य, फिजिओथेरपी शिबिरात ३४० रुग्णांवर मोफत उपचार तर ५६ जनांनी केले रक्तदान

लातूर : - येथील माईर्स एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांचा ६८ वा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रम घेवून साजरा करण्यात आला. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या दंत आरोग्य शिबिरात २११ रुग्णांची व फिजीओथेरपी उपचार शिबिरात १२९ रुग्णांची तपासणी करुन उपचार करण्यात आले. त्याचबरोबर डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. डॉ. हनुमंत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त बुधवारी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख शल्य विभाग व श्रीमती सरस्वती कराड रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, रक्त संक्रमन अधिकारी डॉ. मिना सोनवणे, डॉ. महेश दडपे, डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. व्यंकटेश हंगे, प्रशासकीय अधिकारी बी.बी. सुर्यवंशी, ज्ञानोबा केंद्रे, दयानंद कुलकर्णी, श्रीधर घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. या रक्तदान शिबिरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन डॉ. कराड यांचा वाढदिवस साजरा केला. तसेच एमआयडीएसआर दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने लातूर तालुक्यातील कासारखेडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मोफत दंत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिरात दंत रोग तज्ज्ञांकडून मुख व दंत रोग, हिरड्या व त्यासबंधी आजार, दातांना लागलेली किड, दुधाचे न पडलेले दात व वेडेवाकडे दात अशा १५१ शालेय विद्यार्थ्यांच्या दंत रोगाची तपासणी करुन प्राथमिक समुपदेशन करण्यात आले. यावेळी



शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना टूथब्रश व पेस्टचे वाटप करण्यात आले. या शिबिरास मुख्याध्यापक व्यंकटेश शिवणे, दंत रोग तज्ज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते व डॉ. मानसी बक्कड, डॉ. वैदेही धमाळे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या निकिता जाधव यांची उपस्थिती होती. दातांची निगा कशी राखावी, दुधाच्या दातांचे महत्व, दंत रोग होऊच नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय, अपघातानंतर दातांची घ्यावयाची काळजी, लहान मुलांना उद्भवणारे वेगवेगळे दंत रोग, दंत रोग जडल्यानंतर घ्यावयाचे उपचार व काळजी या विषयी दंत रोग तज्ञ डॉ. सोमनाथ गित्ते यांनी विस्तृत माहिती दिली. त्याचबरोबर औसा तालुक्यातील बुधोडा येथील स्वाधार अंध अपंग स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्र येथे मोफत दंत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिर घेण्यात आले. या शिबिरात ६० अंध - अपंग रुग्णांनी दंत आरोग्य तपासणी करुन दंत आरोग्य राखण्यासाठी तज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. कराड यांच्या वाढदीवसानिमित्त येथील अंध - अपंग व्यक्तींना फळांचे वाटपही करण्यात आले. या शिबिरास संचालक हरिश्चंद्र सुडे, दंत रोग तज्ञ डॉ. प्रकाश कसबे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते रोहित पवार हे उपस्थित होते. तसेच डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर येथील अंबाजोगाई रोडवरील मातोश्री वृध्दाश्रम येथील ज्येष्ठ नागरीकांना स्नेहभोजन देण्यात आले. डॉ. कराड यांच्या वाढदिवसानिमित्त एमआयपी फिजीओथेरपी महाविद्यालय येथे मोफत फिजिओथेरपी उपचार शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मानदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, खांदादुखी, मणक्याचे आजार, गुडघेदुखी, सांधेदुखी, संधीवात, हातापायांना मुंग्या येणे, मार लागलेले खेळाडू अशा विविध आजारांच्या १२९ रुग्णांवर फिजिओथेरपी तज्ज्ञांकडून विविध प्रकारच्या व्यायामाव्दारे उपचार करण्यात आले. त्याचबरोबर दैनंदिन जीवनातील कामाची, बसण्याची योग्य पद्धत, निरोगी जिवनशैली या विषयी उपस्थित रूग्णांना माहिती देण्यात आली. या शिबिरात फिजिओथेरपी तज्ञ डॉ. रिषा कांबळे, डॉ. श्रुती ताडमारे, डॉ. मोहम्म्द झिशान, डॉ. सलीम शेख, डॉ. अनिल साठे यांनी सेवा बजावली. डॉ. हनुमंत कराड यांच्या वाढदिवसानिमित्त येथील माईर एमआयटी शिक्षण संकुल येथील एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, एमआयपी फिजिओथेरपी महाविद्यालय, एमआयएनएस निर्सिंग, एमआयओ ऑप्टोमेट्री महाविद्यालय व मुकूंदराज आणि श्री सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथील प्राचार्य, विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, रुग्ण, त्याचबरोबर विविध क्षेत्रातील हितचिंतक व मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून डॉ. कराड यांना शुभेच्छा दिल्या.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE